**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कलीम रशीद तांबोळी
रशीद पान मार्ट,
आंबेडकर चौक, समर्थ लॉजच्या शेजारी,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पेडगांव, ता.श्रीगोंदा,
जि.अहमदनगर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.१२.२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.०३.२००९ |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री.कलीम रशीद तांबोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०.०१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अरूण मल्हार रणखांबे
१७६, बुधावार पेठ,
मिलिंद नगर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
राष्ट्रीय केमिकल्स फर्टिलायझर्स लि.
क्षेत्रिय कार्यालय पंढरपूर,

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
राष्ट्रीय केमिकल्स फर्टिलायझर्स लि.
क्षेत्रिय कार्यालय पंढरपूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०७/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.१.२००९ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.१३.३.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अरूण मल्हार रणखांबे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकारणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरूध्द अपील केले आहे. ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यक्षेत्रातील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे

केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२२.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. भैरवनाथ सुखदेव भांगिरे
मु.पो.कोंढेज, ता. करमाळा, जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** वनपाल, **उत्तरवादी**
मालढोक पक्षी अभयारण्य,
करमाळा जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३७/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे उत्तर दिल्याची तारीख | दि.३.२.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. भैरवनाथ सुखदेव भांबिरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे अपील केले नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विजय बलभीम पवार
१२५,दक्षिण सदर बझार,
श्रीराम मंदिरा समोर,
मोतीलाल परदेशी वाडा, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
पोलिस उपआयुक्त (मुख्या.),
सोलापूर शहर कार्यालय, सोलापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४४/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २३.१२.२००८ |
| ४ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** निलंबित हेडकॉन्स्टेबल श्री. ए.सी. शेख योनी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री. विजय बलभीम पवार यांनी राज्य माहिती आयोकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. लियाकत आ. डोंगरे
२०६, स्कूल मोहल्ला, महाबळेश्वर, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम अधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर जि. सातारा श्री. किशोर हिराजी बोर्डे | |
| | **जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम अधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर, जि. सातारा श्री. एम.एम. काटेकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या घराशेजारी झालेल्या बांधकामाच्या संदर्भात अपीलकर्ता श्री. लियाकत आ. डोंगरे यांनी मागितलेली माहिती यापूर्वीही एका अपिलात देण्यात आली असून, या अपिलात विहित मुदतीत सर्व माहिती देण्यात आली आहे. संबंधित बांधकाम पाडण्यास न्यायालयाने मनाई हुकूम दिला असून, दिवाणी न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा बांधकाम अधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर श्री. एम.एम. काटेकर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद, महाबळेश्वर श्री. किशोर हिराजी बोंडे यांनी उपरोक्त कागदपत्रांसह नमूद केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. हनुमंत बळवंत भडाळे,
घर क्र.१०८८,रामनगर, वारजे,
लक्ष्मी चौक, पुणे- ५२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अध्यक्ष,
भारतीय शिक्षण संस्था,
१२८/२, जे.पी.नाईक पथ, कोथरुड, पुणे-२९

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
भारतीय शिक्षण संस्था,
१२८/२, जे.पी.नाईक पथ, कोथरुड, पुणे-२९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.०५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.०६.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.०६.२००६ |
| ५ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि.१९.०३.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’मध्ये या अपीलाचा समावेश होता. तथापि जन माहिती अधिकारी तथा सचिव, भारतीय शिक्षण संस्था, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, भारतीय शिक्षण संस्था, पुणे या कार्यक्रमास अनुपस्थित होते. या अनुपस्थितीबाबत आयोगाच्या दि.०२.०४.२००८ च्या पत्रान्वये संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला असता संस्थेचे सदस्य सचिव डॉ.शंकरराव गोवारीकर यांनी त्यांचे

पत्र जा.क्र.५९ दि.०७.०४.२००९ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ भारतीय शिक्षण संस्थेस लागू होत नसल्याने सबब सदर कायद्याची पूर्तता करण्याचा आग्रह करु नये, अशी विनंती केली. तसेच तद्नंतर संस्थेस श्री.भडाळे यांना आवश्यक ती माहिती देण्याबाबत आयोगाने दि.१२.०८.२००८ चे पत्रान्वये अवगत केले असता, संस्थेने सदर निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केल्याचे दि.२८.०८.२००८ च्या पत्रान्वये वेळोवेळी संस्थेने आयोगास अवगत केले. तथापि संस्थेने अद्याप उच्च न्यायालय मुंबई खंडपीठाकडील स्थगिती आदेशाची प्रत वा संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे न्यायालयीन आदेश आयोगास सादर केलेले नाहीत.

दरम्यान अपीलकर्ता श्री.भडाळे व इतर सहा कर्मचाऱ्यांनी आयोगाकडील अपील मागे घेत असल्याचे दि.१३.०४.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. याबाबतच्या कारणांसह निवेदन सादर करण्याचे निदेश आयोगाने श्री.भडाळे यांना दि.१२.०५.२००९ व दि.२२.१०.२००९ च्या पत्रान्वये दिले. त्यावर कोणतेही उत्तर श्री.भडाळे यांनी आयोगास सादर केले नाही. तथापी दि.१४.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये श्री.भडाळे यांनी आयोगास आपल्यासह संबंधित कामगारांना वेतनश्रेणी मिळवून देण्याची विनंती केली आहे. तथापि, सदर मागणी, तसेच त्यांचा मूळ अर्ज व निवेदने यात श्री.भडाळे व इतर कर्मचाऱ्यांनी नमूद केलेले आपल्यावरील अन्याय,वेतनश्रेणी, भविष्य निर्वाह निधी इ. मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०३/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपत धनवडे
अध्यक्ष, अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी मंच, सातारा,
मु.पो.नुने, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे प्रतिनिधी श्री.बी.के.भिंगारे

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे श्री.एस.ई.कांडेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.गणपत धनवडे यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. कळविलेले शुल्क भरल्यानंतर माहिती पाठविण्यात आली. तत्कालीन रोखपालांनी शुल्क जमा झाल्याचे न कळविल्यामुळे दरम्यानच्या काळात माहिती पाठविली नव्हती, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे श्री.एस.ई. कांडेकर यांनी केले. तसेच श्री.धनवडे यांनी आधी माहिती मागितली, नंतर अपील माघारी घेत असल्याचे कळविले व त्यानंतर पुन्हा माहिती मिळाली नाही; म्हणून तक्रार केली व अपील केले, असे जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे श्री.एस.ई. कांडेकर यांनी निदर्शनास आणले. तत्कालीन रोखपाल श्री.आर.एच.फुलसुंगे यांचा खुलासा सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री.फुलसुंगे निवृत्त झाले असून आजारीपणामुळे आपली मानसिक स्थिती बरी नसल्याचे त्यांनी दि.२३.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२२.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.नितीन र. माळवदकर
११, राघवेंद्र, राघवेंद्रनगर बॅगेहळ्ळी रोड,
मार्केट यार्ड जवळ, अक्कलकोट, जि. सोलापूर — **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
१) तहसिलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर
२) मुख्याधिकारी, नगरपरिषद, अक्कलकोट, जि. सोलापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
१) निवासी नायब तहसिलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर
२) माहिती अधिकारी, नगरपरिषद, अक्कलकोट जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३८/२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००९ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-</u>** माहिती - मागणी अर्जाची मूळ प्रत (जोडपत्र - अ) सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री, नितीन र. माळवदकर यांनी दोन माहिती अर्जासाठी एकच अपील दाखल केले आहे. प्रत्येक माहिती अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक असल्याने त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.१.२०१०**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.प्रकाश हरिपंत आपसेकर
घरं नं १६५९, मेढे गल्ली, पंढरपूर ता. जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक ,सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सव्यवस्थापक,
सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक ,सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७/२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.११.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.११.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सह. पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला असल्याने सदरचे अपील दखल योग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२८.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

डॉ.रवींद्र दिगंबर चौधरी
फ्लॅट नं.५-अ, स.न.१२३/१,
तुळसी विहार, बाणेर-म्हाळुंगे रोड, बाणेर (प.),
पुणे-४५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासक,
महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, १८९-अे,
आनंद कॉम्पलेक्स, २ रा मजला,
साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका,
चिंचपोकळी (प.), मुंबई **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रबंधक,
महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, १८९-अे,
आनंद कॉम्पलेक्स, २ रा मजला,
साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका,
चिंचपोकळी (प.),मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.१०.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.११.२००९ |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ.रवींद्र दिगंबर चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे पहाता प्रशासक तथा अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय

परिषद,महाराष्ट्र वैद्यकिय परिषद, मुंबई यांनी दि.०३.११.२००९ रोजी उत्तर दिलेले आहे. तसेच प्रशासकीय गलथानपणामुळे झालेल्या चुकीची दुरुस्ती करुन जुना नोंदणी क्र.१७६/२६ वर माझी आरएमपी म्हणून नोंदणीकरुन नोंदणीप्रमाणपत्र द्यावे, ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३० / ०१/२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर श्रीपती खेडकर
मु.पिंपळे जगताप, ता.शिरुर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.१२.२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.०७.२००७ |
| ४ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -</u>** मौजे पिंपळे जगताप येथील गट क्र.४३४ (जुना गट क्र.८९१) मधील संपादित क्षेत्राचा तपशील | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर श्रीपती खेडकर यांच्या अपीलाचा समावेश दि.३०.०४.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री.खेडकर या कार्यक्रमास गैरहजर होते. तथापि आयोगाने अपीलकर्त्याच्या याच विषयीच्या पूर्वीच्या अपील क्रमांक १२२८/पुणे प्रकरणी दि.१६.०९.२००८ रोजी निर्णय दिला आहे. त्यामुळे हे अपील विचारात घेऊ नये, अशी विनंती उपस्थित जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी, डॉ.दिपा

भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, श्री.पांडुरंग मगदूम यांनी प्रपत्रामध्ये केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३० / ०४/२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्रीमती शकुंतला देवका मोरे
मु.पो.खटकाळे, ता.जुन्नर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

१) **अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे
२) **अपिलीय प्राधिकारी तथा** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, पुणे **उत्तरवादी**

१) **जन माहिती अधिकारी तथा** गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे
२) **जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०९.२००९ दि.१९.०९.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.११.२००९ दि.९.११.२००९ |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती शकुंतला देवका मोरे यांनी आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे अपील विहित नमुन्यात नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.नारायण दत्तात्रय थोपटे
सौ.रेखाताई नारायण थोपटे
घर क्र.२३, स.नं.३६/३, नवनाथनगर,
धनकवडी, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७६ व १८७७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.८.२००९, २०.८.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.८.२००९, २६.८.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.८.२००९, ३१.८.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.१०.२००९, १४.१०.२००९ |
| ४ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.नारायण दत्तात्रय थोपटे व सौ.रेखाताई नारायण थोपटे यांचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने आयोगाकडे दोघांनी अपिले दाखल केली आहेत.

सदर अपिलासोबतची कागदपत्रे पाहता त्यांनी आयोगाकडे केलेल्या यापूर्वीच्या अपिलातील (अपील क्र.२६४६+२६४७+२८४०+२८४१/पुणे) विषय व या अपिलातील विषय व माहिती-मागणी एकच असल्याचे दिसून येते. यास्तव आयोगाने अपील

क्र.२६४६+२६४७+२८४०+२८४१/पुणे मध्ये दि.२०.१०.२००९ रोजी दिलेला आदेश या अपीलातही लागू आहे. त्याच त्याच मागणीसाठी अशा प्रकारे पुनःपुन्हा अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया न घालविण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंडीतराव भिमराव जगताप
५४८ कृष्णकुंज निवास, पारिजात कॉलनी,
हडपसर, पुणे ४११ ०२८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था सोलापूर, जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
१) सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,
आकुलगाव, ता.माढा, जि. सोलापूर-४१३ ००७
२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था माढा,ता.माढा, जि.सोलापूर
३) माहिती अधिकारी, प्रधान कार्यालय दि.सोलापूर डि.से.को.ऑप बँक जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०४+२०५०+२६७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.पंडीतराव भिमराव जगताप
५४८ कृष्णकुंज निवास, पारिजात कॉलनी, हडपसर, पुणे ४११ ०२८

**जन माहिती अधिकारी तथा**

१) सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,
आकुलगाव, ता.माढा, जि. सोलापूर-४१३ ००७ श्री.चंद्रकांत दशरथ तरंगे

२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था माढा,ता.माढा, जि.सोलापूर श्री.अमीतकुमा डी.खंडागळे

३) माहिती अधिकारी, प्रधान कार्यालय दि.सोलापूर डि.से.को.ऑप बँक जि.सोलापूर श्री.सी.आर.राठोड

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १९०४ | १०.१२.२००७ | १७.१२.२००७ | ११.०२.२००८ | ३१.०३.२००८ |
| २०५० | ०२.०४.२००८ | - | ०५.०५.२००८ | - |
| २६७९ | ०३.०९.२००७ | २०.०९.२००७ | | ०१.०२.२००८ |

माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ व दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

**अपील क्र.१९०४**

आकुलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, आकुलगाव, ता.माढा, जि.सोलापूर या संस्थेकडील स्वतःच्या कर्जप्रकरणाची तसेच श्री.अर्जुन भिमराव जगताप यांच्या कर्जप्रकरणातील इकरारपत्राची माहिती आपण मागितली होती. माहिती उशिरा मिळाली. इकरारपत्र व पैसे काढल्याच्या/भरणा केल्याच्या पावत्या मिळत नसल्याचे जन माहिती अधिकारी कळविले. खरेदीखताच्या संदर्भात संस्थेचे सचिव व बँक इन्स्पेक्टर यांना आपण व संबंधित व्यवहारातील खातेदारांनी प्रत दाखविल्याचा पुरावा न देता खोटी व विसंगत माहिती दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पंडीतराव भिमराव जगताप यांनी केले.

**अपील क्र.२६७९**

माहिती देण्याच्या पत्रावर तारखा टाकलेल्या नाहीत. आपली परवानगी न घेताच आपल्या नावे दर्शविलेल्या कर्जखात्यात रक्कम भरली. श्री.अर्जुन भिमराव जगताप यांच्या संदर्भातील माहिती त्यांची व्यक्तिगत असल्याच्या कारणावरुन नाकारली. सर्व प्रकरणातील खोटेपणा व भ्रष्टाचार उघड होण्यासाठी ही सर्व माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पंडीतराव भिमराव जगताप यानी केले.

संबंधित माहिती आकुलगाव संस्थेच्या सचिवांकडील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. श्री.अर्जुन भिमराव जगताप यांचे इकरारपत्र शोध घेऊनही मिळाले नाही. तसेच ती त्यांची वैयक्तिक कागदपत्रे असल्यामुळे त्रयस्थ पक्षाला देता येणार नाहीत, असेही अपीलकर्त्यास कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्या निर्णयानंतर शोध घेतला असता संबंधित कागदपत्रे दप्तरात आढळली नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर, सोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.सी.आर.राठोड यांनी केले. आयोगाने अपील क्र.२०५० यापूर्वी निकाली काढलेले आहे. अपील क्र.२११६ व अपील क्र.२६७९ ही दोन्ही अपिले त्याच माहितीबद्दलची आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

इकरारपत्राचा जतन कालावधी वीस वर्षांचा आहे. बँकेच्या दप्तरी ते आढळत नाही, याचा पूर्ण शोध करून खात्री करून घेतली आहे. अपीलकर्त्याने अपिलात मूळ अर्जातील मुद्दयाव्यतिरिक्त आणखी तपशिलाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. तसेच 'अटींकडे हेतूपुरस्सर टाळाटाळ का केली जाते', 'नो ड्यूज प्रमाणपत्र आपण मागे घेण्यास तयार आहात काय,' अशा स्वरुपाचे अनेक प्रश्न व खुलासे विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी विचारणा करता येत नसूनही संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अनिलकुमार खंडागळे यांनी केले.

इकरारपत्राच्या संदर्भात, तसेच पैसे काढण्याच्या पावत्यांबाबत शोध घेऊन अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार शोध घेतला. श्री.अर्जुन भिमराव जगताप यांच्याशी समक्ष संपर्क साधला असता इकरारपत्राची प्रत त्यांच्याकडेही नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आपल्या संदर्भातील संस्थेकडील कोणतीही माहिती आपल्या लेखी संमतीशिवाय कोणासही देऊ नये, असे त्यांनी संस्थेला लेखी कळविले आहे. बँकेचे खातेदार श्री.अर्जुन भिमराव जगताप यांच्या खात्यातील पैसे काढल्याच्या पावत्यांच्या प्रती बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदीनुसार त्या व्यक्तीव्यतिरिक्त इतरांना देता येत नाहीत, असे बँकेने कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, आकुलगाव विविध कार्यकारी सेवा, सहकारी संस्था, आकुलगाव, ता.माढा, जि.सोलापूर श्री.चंद्रकांत दशरथ तरंगे यांनी दि.६.१.२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

श्री.जगताप यांच्या याच संदर्भातील सहा अपिलांवर आयोगाने यापूर्वी निर्णय दिला असून त्याच विषयांबाबत त्याच स्वरूपाच्या मागणीसाठी पुन:पुन्हा अर्ज व अपिले करू नयेत, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सुरेश विलासराव पाटील
अ-५, रूक्मिणी पार्क, कराड, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता
(२)श्री.संदीपकुमार लालासाहेब जगदाळे
मु.पो.जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा
(३)श्री.अभिजीत जयसिंग नौगान
मु.पो.कातरखटाव, ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१+२४६+६३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.सुरेश विलासराव पाटील
अ-५, रूक्मिणी पार्क, कराड, ता.कराड, जि.सातारा
(२)श्री.संदीपकुमार लालासाहेब जगदाळे
मु.पो.जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| **अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,<br>सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.र.ना.सबनीस<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,<br>सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जि.सातारा श्री.अं.शि.नलावडे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.१२.२००६ (अ.क्र.१९१)<br>दि.२४.१.२००७ (अ.क्र.२४६) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.१.२००७ (अ.क्र.१९१)<br>दि.८.३.२००७ (अ.क्र.२४६) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.२.२००७ (अ.क्र.१९१)<br>दि.३.३.२००७ (अ.क्र.२४६) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.७.२००७<br>(अ.क्र.१९१, अ.क्र.२४६) |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जांची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अ.क्र.१९१ व २४६ या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२१.१.२००९ रोजी अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासनाचे कोणतेही भाग भांडवल मिळालेले नाही. तसेच कोणतेही अनुदान अथवा शासनाची कर्जाला हमी नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच)मधील तरतुदीनुसार बँक 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बँकेला लागू होत नाही. रिझर्व बँकेनेही ही धारणा कायम केली असून सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही तसे स्पष्ट पत्र बँकेला दिले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनीही तसाच निर्णय दिला आहे. तरीही पारदर्शकतेचा भाग

म्हणून राज्य माहिती आयोगाच्या निदेशानुसार बँकेने अपीलकर्ता श्री.सुरेश विलासराव पाटील (अ.क्र.१९१) व श्री.संदीपकुमार लालासाहेब जगदाळे (अ.क्र.२४६) यांना माहितीची संबंधित कागदपत्रे दाखविण्याची तयारी दर्शविली. श्री.पाटील यांनी कागदपत्रे पाहिली नाहीत, तर श्री.जगदाळे यांनी सर्व अभिलेख पाहून माहितीबाबत खात्री करून घेतली. तसेच अपील क्र.६३ मध्ये अपीलकर्ता यांनी माहितीची गरज राहिली नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे, असे प्रतिपादन बँकेचे जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा श्री.अं.शि.नलावडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याची भूमिका कायम ठेवूनही सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेची बँकेने घेतलेली भूमिका उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.१.२०१०**